राज्य व जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगातील गट-अ व गट-ब (राजपत्रित) अधिकाऱ्यांची वयाच्या ५०/५५ व्या वर्षापलिकडे किंवा अर्हताकारी ३० वर्षाच्या सेवा कालावधीनंतर सेवेत राहण्याची पात्र-अपात्रता आजमविण्यासाठी विभागीय पुनर्विलोकन समितीची स्थापना करण्याबाबत....

महाराष्ट्र शासन
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
शासन आदेश क्रमांकः पुनर्वि-२०२६/प्र.क्र.१०७/ग्रा.सं.४
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार,मुंबई-४०० ०३२
तारीख: २५ नोव्हेंबर, २०२६

वाचा :-

१) **सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांकः एलपीलए-२०१७/प्र.क्र.२१/का.पंधरा, दि. १०.०६.२०१९**

प्रस्तावना:-

संदर्भाधीन शासन निर्णयान्वये वयाच्या ५०/५५ वर्षापलिकडे किंवा अर्हताकारी सेवेच्या ३० वर्षानंतर शासकीय अधिकारी / कर्मचारी यांचे सेवा पुनर्विलोकन करुन मुदतपूर्व सेवानिवृत्त करण्याबाबत एकत्रित कार्यपध्दत विहित करण्यात आली आहे. सदर शासन निर्णयातील तरतुदीनुसार अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या प्रशासकीय अधिपत्याखालील, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग व जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगातील गट-अ व गट-ब (राजपत्रित) अधिकाऱ्यांची वयाच्या ५०/५५ वर्षापलिकडे किंवा अर्हताकारी सेवेच्या ३० वर्षानंतर सेवा पुढे चालू ठेवण्याची पात्र-अपात्रता आजमावण्यासाठी विभागीय पुनर्विलोकन समिती गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन आदेश:-

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या प्रशासकीय अधिपत्याखालील, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग व जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगातील गट-अ व गट-ब (राजपत्रित) अधिकाऱ्यांचे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन), नियम-१९८२ च्या नियम १० (४) व नियम ६५ मधील तरतूदीनुसार शासकीय अधिकारी/ कर्मचारी यांच्या वयाच्या ५०/५५ व्या वर्षापलिकडे किंवा अहर्ताकारी सेवेची ३० वर्षे पूर्ण झाल्यानंतर त्यांची शासन सेवा पुढे चालू ठेवण्याची पात्र-अपात्रता आजमविण्यासाठी

उपरोक्त संदर्भाधीन दिनांक १०.०६.२०१९ रोजीच्या शासन आदेशान्वये सूचना देण्यात आलेल्या आहेत. सदर सूचनेस अनुसरुन पुढीलप्रमाणे विभागीय पुनर्विलोकन समिती गठीत करण्यात येत आहे :-

१.	अध्यक्ष	सचिव, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
२.	सदस्य	सह / उप सचिव ग्रा.सं.४
३.	सदस्य	विभागातील मागासवर्गीय सह / उप सचिव
४.	सदस्य सचिव	अवर सचिव, ग्रा.सं.४

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६११२५१२०५१८४१०६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

DEEPALI UPENDRA JAPE

Digitally signed by DEEPALI UPENDRA JAPE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FCSCPD, 2.5.4.20=735D6D81D9099A643DC5A1E7E261A6EA60AD4418817BD25D02DB4654EA8C8E11, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=F1EDA6DD54D9C1D002A33252AA96B6C559E22C914431F772457B39E98A5FCEAC, cn=DEEPALI UPENDRA JAPE
Date: 2026.11.25 12:06:18 +05'30'

(दीपाली जपे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.मंत्री, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव.
२) मा.राज्यमंत्री, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव.
३) मा. अध्यक्ष, राज्य ग्राहक तक्रार निवाण आयोग, महाराष्ट्र मुंबई.
४) मा.सचिव, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहायक.
५) उप सचिव (ग्रा.सं.४), अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहायक.
६) अवर सचिव (ग्रा.सं.४), अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई .
७) प्रबंधक (विधि / प्रशासन), राज्य ग्राहक तक्रार निवाण आयोग, महाराष्ट्र मुंबई.
८) सर्व, प्रबंधक, राज्य ग्राहक तक्रार निवाण आयोग, महाराष्ट्र मुंबई.
९) निवडनस्ती, कार्यासन- ग्रा.सं. ४